# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१८

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### चिखली (जि.बुलढाणा) येथील ५ महाविद्यालयांना विद्युत शुल्क भरण्यापासून सुट मिळणेबाबत

**(१) ६९२७२ (२७-०१-२०१७). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी)** : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिखली (जि.बुलढाणा) येथील ५ महाविद्यालयांचे विद्युत शुल्क भरण्यापासून सुट व भरलेले विद्युत शुल्क परत मिळणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी प्रधान सचिव, उर्जा विभाग यांना पत्राद्वारे विनंती केली असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या शैक्षणिक संस्थांनी या संदर्भातील प्रस्ताव मा.उपकार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, चिखली यांच्याकडे दिनांक १६ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास सादर केलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने निर्णय घेऊन येथील शैक्षणिक संस्थेस विद्युत शुल्क पुर्वलक्ष्यी प्रभावाने परत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२४-१०-२०१८)** : (१) हे खरे आहे.

(२) महावितरण कंपनीकडून प्राप्त दि.१६.११.२०१६ च्या पत्रानुसार महावितरण चिखली मंडळ कार्यालयास दि.१५.०९.२०१६ रोजी प्राप्त झाल्याचे कळविले आहे.

(३) महाराष्ट्र विद्युत शुल्क अधिनियम, २०१६ अंमलात आल्यानंतर, सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० अंतर्गत नोंदणीकृत शैक्षणिक संस्थांचे विद्युत शुल्क परताव्याच्या महावितरणकडे प्राप्त प्रस्तावावर महावितरणद्वारे ऊर्जा विभागाच्या सूचना अपेक्षिल्या होत्या. त्यात चिखली येथील शैक्षणिक संस्थेच्या प्रस्तावाचा समावेश आहे. त्यास अनुसरुन ऊर्जा विभागाद्वारे दि.०४.०६.२०१८ च्या पत्रान्वये अशा शैक्षणिक संस्थांना दि.०१.०९.२०१६ पर्यंत

विद्युत शुल्क परतावा अनुज्ञेय ठरत असल्याचे नमूद करुन पुढील आवश्यक कार्यवाही करणेबाबत महावितरणला सूचित करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

**राज्यात गृहनिर्माण संस्थांचे स्वतंत्र प्राधिकरण करणेबाबत**

**(२) ७७६१० (२१-०४-२०१७). श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात महाराष्ट्र गृहनिर्माण संस्थांचे स्वतंत्र प्राधिकरण करावयाची घोषणा सहकार मंत्र्यांनी दिनांक १८ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासकिय स्तरावर धोरण निश्चित करण्यात आले आहे काय,
(३) असल्यास, त्याचे स्वरुप काय आहे,
(४) नसल्यास, सदर धोरण निश्चित किती कालावधीत ठरविण्यात येणार आहे ?

**श्री. सुभाष देशमुख (२४-१०-२०१८) :** (१) व (२) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मध्ये सहकारी गृहनिर्माण संस्थासाठी स्वतंत्र प्रकरण समाविष्ट करण्यासाठी दि.१०/२/२०१७ च्या शासन निर्णयान्वये समिती गठित करण्यात आली असून समितीने शासनास सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने अधिनियमात सुधारणा करण्याबाबतचा अध्यादेश प्रख्यापित करण्याची कार्यवाही शासनामार्फत सुरु आहे.
(३) २०० पर्यत सदस्यसंख्या असलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या निवडणूका घेण्यासाठी निवडणूकीचे अधिकार, सदस्यावर मर्यादा, सभासदावर ना दस्तऐवज निरीक्षणाचे अधिकार, निधी निर्मिती व गुंतवणूकीचे अधिकार, गणपूर्तीसाठी संख्याबाबतची तरतूद, भूखंड वाटप करण्याची पद्धत इत्यादी बाबीचा अधिनियमात कलमात समावेश आहे.
(४) शासनामार्फत अध्यादेश प्रख्यापित करण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

**महावितरण कंपनीने व्हिलींग चार्जेस मागे घेण्याबाबत**

**(३) ७७८७९ (२८-०४-२०१७). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महावितरण कंपनीने बेकायदेशीरपणे व्हिलींग चार्जेस लागू करुन राज्यातील सुमारे १ लाख यंत्रमागधारक आणि सुमारे ४० लाख कृषि ग्राहकांना याचा आर्थिक त्रास होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, व्हिलींग चार्जेस मागे घेण्याबाबत त्रस्त शेतकरी व यंत्रमागधारकांच्या महाराष्ट्र राज्य वीज ग्राहक संघटनेने शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासन फेरविचार करणार आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-१०-२०१८) :** (१) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या दिनांक ०३.११.२०१६ च्या वीज दर आदेशानुसार महावितरणच्या वीज ग्राहकांच्या वीज बिलात वहन आकार (Wheeling Charges) स्वतंत्रपणे दर्शविण्यात येत आहे. पूर्वी वहन आकार हा वीज आकाराचाच एक भाग होता. सदर वीजदर आदेशापासून प्रथमच महावितरणच्या ग्राहकांना वीज दरातील अस्थिर आकाराची आता वहन आकार आणि वीज आकार अशा दोन घटकांमध्ये विभागणी केलेली आहे.

(२) हे खरे आहे.

(३) वीज वितरण परवाना धारकाच्या कोणत्याही वर्गवारीतील ग्राहकांचे वीज दर ठरविण्याचे अधिकार महाराष्ट्र वीज नियामक आयोगास आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील अनेक कुटुंबिय विद्युत जोडणीपासून वंचित असल्याबाबत**

**(४) ८५१८१ (०९-०८-२०१७). श्री.सुनिल शिंदे (वरळी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.मनोहर भोईर (उरण), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.नारायण पाटील (करमाळा), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यामध्ये १९ लक्ष कुटुंबियांना अदयापही वीज पोहचली नसल्याची कबुली मा.ऊर्जामंत्री यांनी दिली असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाचे डिजिटल गाव तयार करण्याचे धोरण असताना सुमारे १९ लक्ष कुटुंबियांपर्यंत वीज न पोहचण्याचे कारण काय आहे,

(३) तसेच शासनाने १९ लक्ष कुटुंबियांपर्यंत वीज पुरवठा करण्यासाठी अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, यासंदर्भात विभागाने आराखडा तयार केला आहे काय व वीज पुरवठा करण्यासाठी अजून किती कालावधी अपेक्षित आहे,

(४) अदयाप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-१०-२०१८) :** (१), (२) व (३) राज्यामध्ये मार्च, २०१५ अखेर एकूण १९,३६,६९० घरांचे विद्युतीकरण शिल्लक होते. दिनांक २८.०९.२०१८ अखेर विद्युतीकरण शिल्लक असणाऱ्या १,२०,०८७ इतक्या घरकुलांना सौभाग्य योजनेअंतर्गत डिसेंबर, २०१८ अखेर विद्युतीकरण करण्याचे प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### महाराष्ट्रातील उद्योजकांना वीज दरात सवलत मिळण्याबाबत

**(५) ८६३१७ (०९-०८-२०१७). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने विदर्भ व मराठवाड्यातील उद्योगांना वीजेच्या दरात विशेष पॅकेज माहे मार्च, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान जाहीर केल्यामुळे पश्चिम महाराष्ट्रातील उद्योग अडचणीत आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूर जिल्हयातील उद्योगांवर महावितरण कंपनीने वीज गळतीचा भार उद्योजकांवर वहन खर्चाच्या नावाखाली वाढ करुन टाकण्यात आला असून यामुळे आर्थिक भार वाढणार असल्याने त्यांनी त्यांचे उद्योग शेजारील कर्नाटक राज्यात स्थलांतरीत करण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विदर्भ, मराठवाडयाप्रमाणेच उर्वरित महाराष्ट्रातील उद्योजकांना वीज दरात सवलत मिळण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-१०-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### ठाणे जिल्हयातील घाटघर उदचंन जलविद्युत प्रकल्पामुळे बाधित झालेल्या प्रकल्पग्रस्तांना नोकरीत सामावून घेण्याबाबत

**(६) ८७६२२ (०९-०८-२०१७). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयातील घाटघर उदंचन जलविद्युत प्रकल्पामुळे बाधित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पाल्यांना सेवेत सामावून घेण्याची मागणी मुख्य महाव्यवस्थापक (मास), प्रकाशगड, मुंबई यांचेकडे स्थानिक लोकप्रतिनिधी व प्रकल्पग्रस्त सातत्याने करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-१०-२०१८) :** (१) होय, खरे आहे.
(२) घाटघर उदंचन जलविदयुत प्रकल्पाची उभारणी जलसंपदा विभागामार्फत झाली असून सदर जलविदयुत निर्मिती केंद्र भाडेतत्वावर चालविण्यासाठी महाराष्ट्र राज्य विदयुत निर्मिती कंपनीकडे सोपविण्यात आले आहे. सदर केंद्राची उभारणी करण्यासाठी जलसंपदा विभागाकडून जमिन संपादित करण्यात आलेली असल्याने सदर प्रकल्पग्रस्तांना महानिर्मिती कंपनीच्या सेवेत सामावून घेणे शक्य नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बासंबा (ता.जि.हिंगोली) येथील नागरिकांना डिपीवरुन विद्युत जोडणी देण्याबाबत**

**(७) ८९८२७ (०९-०८-२०१७). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बासंबा (ता.जि.हिंगोली) येथील शेतक-यांनी सन २०१० मध्ये विद्युत वितरण कंपनीकडे अनामत रक्कम भरुन वीज घेतली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या विद्युत जोडणीचा विद्युतदाब कमी असल्याने जवळच्या डिपीवरुन विद्युत जोडणीची त्यांनी मागणी केली असून सदरहू मागणी पूर्ण होत नसल्याने शेतक-यांनी दिनांक १४ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी, हिंगोली यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, शेतक-यांच्या निवेदनाची दखल घेऊन मागणी पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-१०-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) बासंबा येथील शेतकऱ्यांची वीज जोडणी असलेल्या ठिकाणचे रोहित्र अतिभारीत असल्याने सदर रोहित्रावरील भार कमी करण्यासाठी सन २०१३ मध्ये एसपीए योजनेअंतर्गत नवीन रोहित्र मंजूर करण्यात आले. सदर मंजूर असलेले रोहित्र नागरे डीपीचे काम करुन कार्यान्वित करण्यात आल्याने अतिभारीत रोहित्रावरील भार कमी झाला आहे. त्यामुळे सद्य:स्थितीत या ठिकाणी नवीन डीपीची आवश्यकता नाही. सद्य:स्थितीत सदर शेतकऱ्याचा वीज पुरवठा योग्य दाबाने सुरळीत चालू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही

---

**नाशिक जिल्ह्यामध्ये आदिवासी उपयोजनेंतर्गत दुधाळ गाईंचा पुरवठा करण्याच्या प्रकल्पाबाबत**

**(८) ९५६७८ (२९-१२-२०१७). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यामध्ये आदिवासी जाती उपयोजनेतंर्गत राबविण्यात येणाऱ्या नाविन्यपूर्ण योजनेतून आमदार आदर्श ग्राम योजनेसाठी निवडलेल्या लासलगाव, देवगाव (ता.निफाड) व अंदरसुल (ता.येवला) या गावातील महिलांचे सक्षमीकरण करण्यासाठी दुधाळ गाईंचा पुरवठा करणे हा पथदर्शी प्रकल्प राबविण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक ४ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास जिल्हा प्रशासनाकडे व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, नाशिक यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विष्णु सवरा (२१-०९-२०१८) :** (१) खरे आहे.

(२) व (३) लासलगाव, देवगाव (ता.निफाड) व अंदरसुल (ता.येवला), जि.नाशिक या गावांचा समावेश आदिवासी उप योजनेंतर्गत नसल्याने या गावांतील महीलांना नाविन्यपुर्ण योजनेंतर्गत लाभ देता येणार नाही.

---

**ठाणे शहरात सुरु असलेल्या अनियमित भारनियमनाबाबत**

**(९) ९५७७० (०१-०१-२०१८). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहर 'अ' वर्गात मोडत असून शहरवासीयांकडून जादा दराने वीज देयक वसुल केले जात असतानाही माहे ऑक्टोबर, २०१७ पासुन अनियमित भारनियमन सुरु केल्याप्रकरणी लोकप्रतिनिधी तसेच नागरिकांनी मा.मुख्यमंत्री, मा.ऊर्जामंत्री यांचेकडे दिनांक ५ आक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने उक्त प्रश्नी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार शासनाने भारनियमन कमी करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी अद्याप कोणताही निर्णय घेतला नसल्यास, त्याची कारणे काय आहेत, तसेच ठाणे शहराबरोबरच कळवा, मुंब्रा येथील वीज ग्राहकांना भेडसावणा-या समस्या सोडविण्यासंदर्भात आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-१०-२०१८) :** (१) व (२) हे खरे आहे.

माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये महावितरण कंपनीने सर्व स्त्रोतांकडून उपलब्ध असलेली वीज व मागणी यांचा ताळमेळ घालून देखील कोळशावर आधारीत संच बंद पडणे, कोळसा कमी उपलब्ध होणे या कारणांमुळे भारनियमनाची स्थिती निर्माण झाली होती. या अडचणींवर मात करण्यासाठी महावितरणची वीज उपलब्धता वाढविण्यासाठी महानिर्मिती कंपनीस सूचना देणे, संचांची दुरुस्ती व देखभालाचे वेळापत्रक बदलणे, केंद्रीय वाटा व पॉवर एक्सेंज मधून अतिरिक्त वीज विकत घेणे, लघुकालीन निविदा प्रकाशित करुन त्याद्वारे वीज खरेदी करणे, असे भार नियमनबाबत उपाय करण्यात आले.

(३) माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये दिनांक ०३.१०.२०१७ ते ०७.१०.२०१७ या कालावधीकरिता तात्पुरत्या स्वरुपाचे भारनियमन लागू करण्यात आले होते. तसेच ठाणे शहराबरोबरच कळवा, मुंब्रा येथील वीज ग्राहकांना भेडसावणाऱ्या समस्यांचे निराकरण करण्याकरिता व विद्युत यंत्रणांचे सक्षमीकरण करण्याकरिता एकात्मिक ऊर्जा विकास योजनेअंतर्गत नवीन रोहित्रे, उच्च/लघुदाब वीज वाहिन्यांचे जाळे उभारणी यासारखी इतर कामे समाविष्ट केलेली आहेत.

---

## कर्जत (जि.रायगड) येथील महावितरण कार्यालयातील अधिकारी रोहित्र बदलून देण्याच्या कामामध्ये आर्थिक गैरव्यवहार करीत असल्याबाबत

**(१०) ९५८७४ (२९-१२-२०१७). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत (जि.रायगड) येथे महावितरणचे कर्जत, जामखेड आणि श्रींगोदे या तीन तालुक्याचे उपविभागीय कार्यालय असून शेतक-यांना रोहित्रात बिघाड झाल्यावर ते बदलून देण्यासाठी सदरील कार्यालयातील अधिकारी हे आर्थिक गैरव्यवहार करत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महावितरणचे अधिका-यांकडून शेतकरी व नागरीकांची अडवणूक होत असल्याने अशा अधिका-यांवर कारवाई करण्याची मागणी येथील नागरिकांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच प्रतीक्षा यादीतील प्राधान्यक्रमानुसार रोहित्र देण्यासाठी शासनाने एक समिती स्थापन करण्याबाबत तसेच महावितरणच्या अधिका-यांनी यादीमध्ये नाव नसताना रोहित्र दिल्यास त्यांचेवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-१०-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) साधारणत: महावितरणच्या उपविभागीय कार्यालयांकडून नादुरुस्त वितरण रोहित्रांचा दैनंदिन अहवाल विभागीय कार्यालयाच्या गाळणी कक्षाकडे सादर करण्यात येतो. गाळणी कक्षाकडे नादुरुस्त वितरण रोहित्रांची विभागस्तरीय जेष्ठता यादी उपलब्ध असते. या जेष्ठता यादीनुसारच गाळणी कक्षाकडून वितरण रोहित्र वितरीत केली जातात.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**खोपडी खु. गावातील (ता. सिन्नर, जि. नाशिक) कृषिपंप धारकांना पुरेशा दाबाने वीज पुरवठा करण्याबाबत**

**(११) ९५९८३ (२९-१२-२०१७). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खोपडी खु. गावातील (ता. सिन्नर, जि. नाशिक) कृषिपंप धारकांना पुरेशा दाबाने वीज पुरवठा होत नसल्याने शेतमालाचे नुकसान होत असून सदर ट्रान्सफार्मरची क्षमता वाढवून मिळणेसाठी कृषिपंप धारकांनी व स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १५ सप्टेंबर २०१७ रोजी वा त्या सुमारास कार्यकारी अभियंता, म. रा. वि. वि. कंपनी यांना लेखी निवेदनाद्वारे मागणी केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-१०-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) सदर ठिकाणी १५ x ३ केव्हीए सिंगलफेजचे १ रोहित्र केंद्र असून ते अतिभारीत झालेले आहे. त्या ठिकाणी ६३ केव्हीए क्षमतेच्या नवीन रोहित्राची उभारणी तसेच सध्याच्या रोहित्रांची क्षमता ४५ केव्हीए वरुन ७५ केव्हीए करण्यासाठी रु. ५.२३ लाखांचा प्रस्ताव जिल्हा नियोजन योजनेअंतर्गत वर्ष २०१८-१९ मध्ये समाविष्ट करण्यासाठी जिल्हा नियोजन समितीकडे महावितरण कंपनीमार्फत सादर करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कुसुर, अंगुलगाव व भरवसफाटा (जि.नाशिक) येथे नवीन विद्युत उपकेंद्र निर्माण करण्याबाबत**

**(१२) ९६३३९ (०१-०१-२०१८). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील कुसुर, अंगुलगाव व भरवसफाटा येथे स्थानिक लोकप्रतिनिधींनी मागणी केलेल्या नवीन विद्युत उपकेंद्रांना पं. दीनदयाळ उपाध्याय ग्राम ज्योती योजना किंवा इन्फ्रा २ वा ३ मध्ये अंतर्भूत करण्याचे मा.उर्जा मंत्री यांनी दिनांक ११ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास महावितरणाच्या संचालकास निर्देश देऊनही माहे ऑक्टोंबर, २०१७ पर्यंत सदर नवीन विद्युत उपकेंद्रांना उक्त योजनेमध्ये अंतर्भूत करण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबतची कारणे काय आहेत तसेच प्रश्न भाग (१) मधील नवीन विद्युत उपकेंद्र निर्माण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत तसेच याबाबतची सद्य:स्थिती काय आहे?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-१०-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) नाशिक जिल्ह्यातील मालेगाव मंडलांतर्गत अंगुलगांव कुसूर येथील ३३/११ के.व्ही. उपकेंद्रांचा प्रस्ताव पं.दीनदयाळ उपाध्याय ग्रामज्योती योजनेंतर्गत प्रस्तावित होते. परंतु या योजनेतील निधीच्या मर्यादेमुळे सदरचे प्रस्तावित उपकेंद्र सदर योजनेमधून वगळण्यात आले. नाशिक जिल्ह्यातील नाशिक शहर मंडलांतर्गत भरवस फाटा, ता.निफाड व त्या बाजूचे परिसरात सद्यस्थितीत ३३/११ के.व्ही. (१X५MVA) मारलगाव उपकेंद्र, ३३/११ के.व्ही. (३x५ MVA) देवगाव उपकेंद्र व ३३/११ के.व्ही. (२x५ MVA) विंचूर उपकेंद्र याद्वारे वीज पुरवठा करण्यात येतो. तसेच पायाभूत आराखडा-२ योजनेअंतर्गत कानळद, ता. निफाड येथे ३३/११ के.व्ही. उपकेंद्राचे काम कंत्राटदारास दिनांक ३०.१२.२०१३ रोजी देण्यात आलेले होते परंतु जागा उपलब्ध नसल्यामुळे उपकेंद्राचे काम कंत्राटातून काढून घेण्यात आले. सदर उपकेंद्राची जागा दिनांक १८.०१.२०१८ रोजी ताब्यात आली असून सदर उपकेंद्राची निविदा प्रक्रिया काढण्याचे काम सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**डोंबिवली (जि.ठाणे) येथील औद्योगिक विभागातील अति धोकादायक कारखाने स्थंलातरीत करण्याबाबत**

**(१३) १००२२२ (०३-०१-२०१८). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डोंबिवली (जि.ठाणे) येथील सुरक्षेसाठी औद्योगिक विभागातील अतिधोकादायक रासायनिक कारखान्यांना इतरत्र स्थंलातरीत करणार असल्याचे मा.उद्योग मंत्री यांनी माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान घोषित केले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी आतापर्यत रासायनिक कारखाने स्थंलांतरीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (०८-१०-२०१८) :** (१) अशी बाब नाही.

तथापि, स्थानिकांकडून मा. मंत्री (उद्योग) महोदयांना अति धोकादायक कारखाने स्थलांतरित करण्याबाबत विनंती केली असता याबाबत शासन सकारात्मक विचार करेल असे सांगण्यात आले होते.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कुंभोज (ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर) येथे मळे भागातील शेतकरी व ग्रामस्थांनी वीज वितरण कार्यालयावर मोर्चा काढल्याबाबत**

**(१४) १००८२९ (०१-०१-२०१८). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुंभोज (ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर) येथे मळे भागातील शेतकरी व ग्रामस्थांनी दिनांक ९ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास महावितरण कार्यालयावर मोर्चा काढून मोर्चेक-यांनी संबधित अधिका-यांना लेखी निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनात संबधितांनी कोणत्या मागण्या केल्या आहेत, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार मागण्या पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-१०-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) दि. ०९.१०.२०१७ रोजीच्या निवेदनान्वये कुंभोज येथे मळे भागातील शेतकरी व ग्रामस्थांनी सिंगल फेजींग वरील भार नियमन मागे घेण्यासाठी तसेच महावितरणच्या नियमाप्रमाणे थ्री फेज पुरवठा मिळावा अशी मागणी केली होती.

माहे सप्टेंबर व ऑक्टोबर, २०१७ मध्ये कोळशाच्या उपलब्धतेत आलेल्या अडचणीमुळे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये दि.७.०९.२०१७, ०९.०९.२०१७ ते दि. १८.०९.२०१७, दि.२६.०९.२०१७ ते दि.२९.०९.२०१७ तसेच माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये दि. ०३.१०.२०१७ ते दि.०७.१०.२०१७ या कालावधीसाठी मा. वीज नियामक आयोगाने दिलेल्या निकषानुसार राज्यात तात्पुरत्या स्वरुपाचे भारनियमन करण्यात आले होते. वीजेची उपलब्धता वाढविण्यासाठी महावितरणने माहे सप्टेंबर मध्ये ३९५ मे.वॅ. व माहे ऑक्टोबर मध्ये ७०० मे.वॅ. एवढी वीज लघुकालीन निविदेद्वारे खरेदी केली होती. सदर उपाययोजनेमुळे दिनांक ०८.१०.२०१७ पासून वीजेच्या कमतरतेच्या कारणास्तव भारनियमन करण्यात आलेले नाही

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उरण तालुक्यातील (जि. रायगड) कुंडेगाव, पाणदिवे, सारडे, वशेणी, पिरकोन, पाले, गोवठणे, पाले, कडापे, या गावातील विद्युत पोलची दुरवस्था झाल्याबाबत**

**(१५) १००८९६ (०१-०१-२०१८). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण तालुक्यातील (जि.रायगड) कुंडेगाव, पाणदिवे, सारडे, वशेणी, पिरकोन, पाले, गोवठणे, पाले, कडापे, या गावातील विद्युत पोल दुरवस्था झालेली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त दुरवस्था दूर करणेबाबत तसेच विज पुरवठ्याच्या अन्य समस्यांबाबत संबधितांकडे ग्रामस्थांनी वारंवार लेखी निवेदनाद्वारे विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-१०-२०१८) :** (१) उरण तालुक्यातील सदर गावे खाडी भागाच्या जवळ असल्याने उच्चदाब व लघुदाब वाहिनींचे पोल व तार गंजण्याचे प्रमाण जास्त आहे.

(२) हे खरे आहे.

(३) उरण शहरातील विद्युत वाहिनी बदलण्याचे व नूतनीकरणाचे काम पं. दिनदयाळ उपाध्याय ग्रामीण विद्युतीकरण योजनेअंतर्गत मंजूर आहे. सदर कामाचा कार्यादेश दिनांक २४.०४.२०१७ व ०२.११.२०१७ रोजी कंत्राटदारास देण्यात आला असून कामे प्रगतीपथावर आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ओझर विभागातील शॉर्ट सर्किट मुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना भरपाई देणेबाबत**

**(१६) १०१२८९ (०१-०१-२०१८). श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ओझर विभागातील (जि. नाशिक) १९ शेतकऱ्यांच्या शेतात झालेल्या शॉर्ट सर्किटमुळे त्यांचे नुकसान झाले असून त्याची भरपाई देण्यात यावी यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ८ नोव्हेंबर, २०१७ रोजी मुख्य अभियंता, महावितरण यांना निवेदन दिलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शॉर्ट सर्किटमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-१०-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) ओझर विभागात एकूण ०८ जळीत प्रकरणे झाली आहेत. त्यापैकी ५ प्रकरणामध्ये महावितरण कंपनी जबाबदार आहे व या ५ जळीत प्रकरणात एकूण ७ शेतकऱ्यांचे नुकसान

झाले आहे. उर्वरित ३ प्रकरणात महावितरण कंपनी जबाबदार नाही. या ३ प्रकरणामध्ये एकूण १३ शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. संबंधितांना नुकसान भरपाई देण्याची कार्यवाही महावितरण कंपनीमार्फत करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड जिल्हयातील मन्नेरवारलू, कोळी महादेव, ठाकूर, ठाकर, राजगोंड जमातीच्या लोकांना जात वैधता प्रमाणपत्रे देण्याबाबत**

**(१७) १०२५७० (२९-१२-२०१७). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडयातील विशेषतः नांदेड जिल्हयात मन्नेरवारलू, महादेव कोळी, ठाकूर, ठाकर, राजगोंड इ. अनुसूचित जमातीच्या लोकांना जात वैधता प्रमाणपत्रे देण्यामध्ये शासकीय अधिका-यांकडून अन्याय होत असल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक २५ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री, मा.आदिवासी विकास मंत्री, सचिव, आदिवासी विकास विभाग व आयुक्त, आदिवासी विकास विभाग यांच्याकडे लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनावर कोणतीही कार्यवाही झाली नसल्याने अखिल महाराष्ट्र मन्नेरवारलू संघटना, नांदेड यांनी जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड या कार्यालयावर दिनांक ३० नोव्हेंबर, २०१७ रोजी मोर्चा काढण्याबाबत मा.मुख्यमंत्री, मा.आदिवासी विकास मंत्री, दिनांक १५ नोव्हेंबर, २०१७ रोजी लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मन्नेरवारलू, कोळी महादेव समाजाच्या व्यक्तींना जात वैधता प्रमाणपत्रे देण्यामध्ये होणारा अन्याय दूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. विष्णु सवरा (१०-१०-२०१८) :** (१) व (२) मन्नेरवारलू, कोळी महादेव व ठाकूर इत्यादी जमातीवर होत असलेल्या अन्यायासंदर्भात आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्यासमवेत बैठक आयोजित करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दि.२५.०९.२०१७ रोजी निवेदन दिले होते. सदर निवेदनाच्या अनुषंगाने मन्नेरवारलु व कोळी महादेव जात वैधता प्रलंबित प्रकरणांच्या अनुषंगाने दि.२४.०४.२०१८ व दि.०३.०५.२०१८ रोजी बैठकांचे आयोजन करण्यात आले होते. तथापि, काही अपरिहार्य कारणामुळे सदर बैठक होवु शकली नाही.

(३) मा.सर्वोच्च न्यायालयाने कु.माधुरी पाटील विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर प्रकरणी दिलेल्या मार्गदर्शक सुचना व त्याअनुषंगाने सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम २००३ मधील विहित तरतुदी अन्वये प्राप्त होणारे जात प्रमाणपत्र प्रस्ताव तपासण्यात येतात. प्रत्येक प्रकरण हे स्वतंत्रपणे माहिती व पुराव्याच्या आधारे पडताळणी करण्यात येते.

---

## उस्मानाबाद जिल्ह्यातील महावितरण कंपनीच्या कार्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(१८) १०३११० (०१-०१-२०१८). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये महावितरण कंपनीमध्ये अधिकारी व कर्मचारी यांची पदे रिक्त असून त्यामध्ये कार्यकारी अभियंता १, उपकार्यकारी अभियंता ५, व्यवस्थापक (विवले) १, सहाय्यक अभियंता १०, कनिष्ठ अभियंता १८, सहायक लेखापाल (विवले) १०, लाईनमन १६६ तसेच ऑपरेटर पद रिक्त आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रिक्त जागा भरण्यासाठी लोकप्रतिनिधींनी दिनांक ३० जून, २०१७ रोजी लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले, त्यानुसार रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-१०-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) महावितरण कंपनीकडून अभियंत्यांची रिक्त पदे बदली व पदोन्नतीने भरण्याची प्रक्रीया चालू आहे. वाहिनी व उपकेंद्र चालक संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या ३४४ रिक्त पदांपैकी २४४ रिक्त पदांवर बाहयस्त्रोत पध्दतीने कर्मचाऱ्यांची भरती महावितरण कंपनीकडून करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जिल्हा परिषदेच्या शाळा, आरोग्य केंद्रे या सार्वजनिक सेवा देणाऱ्या संस्थांकडून घरगुती दराने वीज देयके आकारण्याबाबत

**(१९) १०३४१९ (०१-०१-२०१८). श्री.बसवराज पाटील (औसा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा परिषदेच्या शाळा, प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र, पशुवैद्‌यकीय दवाखाने या सार्वजनिक सेवा देणाऱ्या संस्थांना महावितरणमार्फत व्यावसायिक दराने वीजदेयक आकारणी केली जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सार्वजनिक सेवा देणाऱ्या संस्थांमार्फत जिल्हा परिषदेला उत्पन्न मिळत नसून जिल्हा परिषदांना सरकारी अनुदान मिळत असले तरी योजना राबविण्याच्या माध्यमातून अनुदान खर्च होत असल्याने वीज देयकासाठीही रक्कम बाकी राहत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महावितरणने सार्वजनिक सेवा देणाऱ्या संस्थांना घरगुती दराने वीजदेयक आकारणी करावी अशी मागणी अहमदनगर जिल्हा परिषदेने महावितरणकडे केली असून शासनाने या मागणीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-१०-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) जिल्हा परिषदेच्या शाळा, प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र, पशुवैद्यकीय दवाखाने यांना विद्युत नियामक आयोगाने निर्धारीत केलेल्या सार्वजनिक सेवा वर्गवारीनुसार वीज दर आकारण्यात येतो. लघुदाब सार्वजनिक सेवा वर्गवारीचे दर हे घरगुती वर्गवारीतील दराच्या तुलनेत कमी आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अर्धापूर (जि.नांदेड) तालुक्यात वीज देयके थकल्याने शेतातील मोटार पंपाचा वीज पुरवठा खंडित करण्यात आल्याबाबत

**(२०) १०३५४३ (०१-०१-२०१८). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अर्धापूर तालुक्यात (जि.नांदेड) वीज देयके थकल्याने शेतातील मोटार पंपाला वीजपुरवठा खंडित करण्यात आला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे विहिरीत पाणी असूनही पिकांना पाणी देता न आल्याने शेतक-यांचे आर्थिक नुकसान होत आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास, शेतीपंपाचा पुरवठा खंडीत न करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-१०-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) कृषी ग्राहकांना मूळ वीज देयकाची रक्कम हप्त्याने भरण्यासाठी शासनाने मुख्यमंत्री कृषी संजीवनी योजना २०१७ दि.३१.०३.२०१७ रोजी जाहीर केलेली आहे. या योजनेत वीज देयकाच्या थकबाकीनुसार प्रथम रु.३,०००/- किंवा ५,०००/- भरुन सहभागी होता येते. या योजनेत पहिला हप्ता भरण्यासाठी तीन महिन्यांची मुदतवाढ दि.२८.०२.२०१८ पर्यंत व शेवटचा हप्ता भरण्याची मुदतवाढ दिनांक ३१.०३.२०१९ पर्यंत देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**येवला व निफाड (जि.नाशिक) मधील रस्त्यांच्या**
**कामांना मंजुरी मिळण्याबाबत**

**(२१) १०६३५३ (०४-०४-२०१८). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **खनिकर्म मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खाण व खनिजे (विकसन व विनियमन) सुधारणा अधिनियम, २०१५ मधील कलम ९ - ब मधील तरतुदीनुसार राज्यातील प्रत्येक जिल्ह्यांमध्ये खाणबाधित क्षेत्राच्या विकासाकरीता जिल्हा प्रतिष्ठान स्थापन करणे बंधनकारक असूनही माहे जानेवारी, २०१८ पर्यंत नाशिक जिल्हा खनिज प्रतिष्ठानची स्थापना करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खनिज विकास निधीमधून येवला व निफाड (जि.नाशिक) तालुक्यातील रस्त्यांच्या कामांना मंजुरी मिळण्याची स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ११ मे, २०१७ व दिनांक ३ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्या सुमारास मा.पालकमंत्री नाशिक व जिल्हाधिकारी, नाशिक यांचेकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी नाशिक जिल्हा खनिज प्रतिष्ठानची स्थापना करून नाशिक जिल्ह्यातील निफाड व येवला येथील रस्त्यांच्या कामांना मंजुरी मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१६-१०-२०१८) :** (१) शासन अधिसूचना दिनांक ०१.०९.२०१८ अन्वये नाशिक जिल्हा खनिज प्रतिष्ठानची स्थापना करण्यात आलेली आहे.

(२) निफाड व येवला तालुक्यातील कामांना मिळणेबाबत श्री. छगन भुजबळ, विधानसभा सदस्य यांनी दिनांक १०.०५.२०१७ च्या पत्रान्वये मागणी केलेली आहे.

(३) जिल्हा खनिज प्रतिष्ठानच्या स्थापनेनंतर यापुर्वीचा महाराष्ट्र खनिज विकास निधी अधिनियम २००१ निरसित करण्यात आला आहे. यास्तव शासनपत्र दिनांक १७.०४.२०१८ अन्वये खनिज विकास निधी अंतर्गत मंजूर प्रकल्प / विकास कामे जिल्हा खनिज प्रतिष्ठान मार्फत उपलब्ध निधीतून पुर्ण करण्याचे निर्देश दिलेले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मु.देवाडा खुर्द (ता.पोम्भूर्णा, जि.चंद्रपूर) येथील शेतकऱ्याने**
**कर्जबाजारीपणामुळे केलेली आत्महत्या**

**(२२) १०६५३२ (०१-०४-२०१८). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मु.देवाडा खुर्द (ता.पोम्भूर्णा, जि.चंद्रपूर) येथील श्रीमती भारती साईनाथ कोपावार या महिलेच्या पतीने दिनांक २८ डिसेंबर, २०१४ रोजी कर्जबाजारीपणामुळे आलेल्या नैराश्यातून

राहत्या घरी गळफास घेवून आत्महत्या केल्याने त्यांचे संपूर्ण कुटुंब निराधार झाले असून कर्ज देणारी महिंद्र फायनान्स कंपनी यांनी त्यांच्या राहत्या मालमत्तेवर टाच आणण्यासाठी कोर्टात दावा दाखल केल्याने सदर महिलेस या कर्जामुळे आलेल्या नैराश्यापोटी कंटाळून शासनाकडे कर्जमुक्ती करिता विनंती अर्ज केला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती कर्जबाजारीपणामुळे नैराश्य आलेल्या राज्यातील आत्महत्याग्रस्त शेतकरी विधवा आणि त्यांचे कुटुंबीय यांना संपूर्ण कर्जमुक्ती देण्याबाबात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२२-१०-२०१८) :** (१) कर्जबाजारीपणामुळे आत्महत्या केली तसेच कर्जाचे वसूलीकरीता संबंधीत कंपनीने कोर्टात दावा दाखल केला हे खरे आहे.

(२) मृतकांनी दिनांक १५/०१/२०१४ ला महिंद्रा रूरल हाउसिंग कंपनीकडून घर सुधारणेसाठी मौजे देवाडा खुर्द येथील मालमत्ता गहाण ठेवून कर्ज घेतले होते. सदर अर्जदाराकडून आत्महत्येनंतर कर्ज हप्त्याची परतफेड न झाल्याने कंपनीने अर्जदाराविरूध्द दावा दाखल केला, सदर दावा दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर, चंद्रपूर यांचेकडे सुरू आहे.

(३) शासन निर्णय दिनांक २८/०६/२०१७ अन्वये छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७ योजनेअंतर्गत ज्या शेतकऱ्यांनी पीक कर्ज व मध्यम मुदत कर्ज जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक व व्यापारी बँकांकडून घेतले आहे अशा शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ काही अटी व शर्तीच्या अधीन राहून दिला जातो. सदर मृतकांच्या कुटुंबियास महसूल विभागाकडून सानुग्रह अनुदान मंजूर करण्यात आले आहे, परंतु सदर कर्ज महिंद्रा रूरल हाऊसिंग कंपनीकडून घेतले असून या प्रकरणाचा समावेश कर्जमाफी योजनेच्या व्याप्तीमध्ये होत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयात शेतीपंप वीज धारकांना रिडिंग न घेताच**
**वीज देयके दिल्याबाबत**

**(२३) १०७४२९ (०४-०४-२०१८). श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयात पावसाळयात शेती पंपाचा वापर होत नसतानाही मागील दोन वीज देयकांचे रिडींग न घेताच तिसरे देयके काढणे, विद्युत बिले वेळेवर न मिळणे, प्रत्यक्ष जागेवर न जाता व मीटरचा फोटो न घेता अवास्तव देयके काढली जात असल्याने महावितरणच्या या गैरकारभारामुळे शेतक-यांनी आंदोलन करण्याचा इशारा शासनाला दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्युत पंपाचे रिडींग घेणे, देयकाची प्रिंट काढून ते ग्राहकापर्यंत पोहचविणे यासाठी महावितरणने खाजगी ठेकेदार व ठेकेदारांनी उपठेकेदार नेमले असल्याने देयकांमध्ये विसंगती निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे व त्यानुसार याप्रकरणी जबाबदार असणा-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-१०-२०१८) :** (१) हे खरे नाही.

कोल्हापूर जिल्ह्यात ९२% कृषी ग्राहकांना मीटर बसविणेत आलेले आहे. सदर ग्राहकांचे मोबाईल ॲपद्वारे रिडिंग घेण्यात येत असून त्यांच्या मीटर वाचनाप्रमाणे वीज देयके देण्यात येतात. ज्या ग्राहकांनी मोबाईल नंबर महावितरण कंपनीकडे रजिस्टर केलेला आहे. त्या ग्राहकांना त्यांच्या मोबाईल नंबरवर रिडिंग कळविले जाते. व चुकीचे रिडिंग असल्यास ग्राहकांकडून मोबाईल ॲपद्वारे रिडिंग आल्यास त्याप्रमाणे वीज देयक देण्यात येते.

कोल्हापूर जिल्ह्यामध्ये फिडरनिहाय कृषीपंपाचे वीज देयकाचे निराकरण करण्यासाठी दिनांक ३१.०१.२०१८ अखेर एकूण १७२३ ग्राहकांच्या चुकीची देयकासंदर्भात तक्रारी प्राप्त झालेल्या होत्या त्यापैकी एकूण १७२१ देयके दुरुस्त करुन देण्यात आलेली आहेत.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याबाबत**

**(२४) १०८३८९ (२३-०४-२०१८). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने राज्यातील शेतकऱ्यांचे ३४ हजार कोटीची कर्जमाफी जाहीर केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, माहे नोव्हेंबर, २०१७ अखेर कर्जमाफीसाठी राज्यात किती शेतकऱ्यांनी अर्ज केले आहेत व त्यापैकी किती शेतकऱ्यांची प्रत्यक्षात कर्जमाफी झाली आहे व अद्याप किती शेतकऱ्यांना कर्जमाफी देणे बाकी आहे,
(३) उर्वरित शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यास होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत व त्यांना तातडीने कर्जमाफी देण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२३-१०-२०१८) :** (१) होय.
(२) व (३) या योजनेअंतर्गत लाभ मिळण्यासाठी शेतकऱ्यांकडून सुमारे ५६.५९ लाख अर्ज प्राप्त झाले असून यापैकी दिनांक २०/१०/२०१८ पर्यंत एकूण ४०.१४ लाख शेतकऱ्यांना रूपये १६,६३६ कोटी रकमेचा लाभ देण्यात आला आहे. उर्वरित पात्र शेतकऱ्यांना योजने अंतर्गत लाभ देण्याची कार्यवाही सुरू असल्यामुळे पात्र लाभार्थ्यांना लाभ देण्यास कोणताही विलंब झालेला नाही.

---

**शासनाच्या कर्जमाफीच्या धोरणाची अंमलबजावणी करण्याकरिता वापरण्यात येत असलेल्या आज्ञावलीमधील त्रुटी दूर करण्याबाबत**

**(२५) १०८७३४ (१९-०४-२०१८). श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाच्या कर्जमाफीच्या धोरणांअंतर्गत कर्जमाफीच्या ऑनलाईल फाईल सादर करण्याकरिता विशिष्ट आज्ञावली वापरण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आज्ञावलीमध्ये काही त्रुटी राहिल्यामुळे संपुर्ण फाईल निरंक होवुन परत येत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२२-१०-२०१८) :** (१) होय.
(२) व (३) आज्ञावलीमध्ये दिसून आलेल्या त्रुटीचे निरसन वेळचेवेळी करून छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७ या योजनेची अंमलबजावणी यशस्वीरीत्या करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बिलोली (जि.नांदेड) तालुक्यातील गोदावरी नदीवर उपसा जलसिंचन प्रकल्प उभा करण्यासाठी घेण्यात आलेल्या कर्जात वाढ झाली असल्याबाबत**

**(२६) १०९१७२ (१०-०४-२०१८). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बिलोली (जि.नांदेड) तालुक्यातील गोदावरी नदीवर सन १९८५ साली उपसा जलसिंचन प्रकल्प उभा करण्यासाठी घेण्यात आलेले २ कोटी ५ लाखाच्या कर्जाचे व्याज ५ कोटी ५५ लाखांपर्यंत पोहचले असून एकूण ४८९ शेतक-यांवर ७ कोटी ५५ लाखांचा कर्जात वाढ झाली असल्याचे दिनांक २५ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ३२ वर्षापासून हा प्रकल्प पूर्ण होवू शकला नाही पण शेतक-यांच्या ७/१२ वर कर्जात वाढ झाल्याने सदरील शेतकरी शासनाच्या विविध योजनांपासून वंचित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सदरील शेतक-यांना संर्पूण कर्जमाफी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (११-१०-२०१८) :** (१) होय.
(२) होय.
(३) प्रा. वैद्यनाथन समितीने शिफारस केल्यानुसार या योजनेसाठी रु.२ कोटी ७ लाख इतके अनुदान देण्यात आले असून सदर रक्कम बँकेने व्याजात जमा करुन घेतले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मंगळवेढा (जि.सोलापूर) येथील संजय गांधी निराधार योजनेबाबत**

**(२७) १०९७१२ (२३-०४-२०१८). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मंगळवेढा (जि. सोलापूर) येथील संजय गांधी निराधार योजना या समितीची सन २०१६ पासून आजतागायत कोणतीही बैठक झाली नसल्याने सदर योजनेचा लाभ वंचित घटकांना मिळत नसल्याबाबतची तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १८ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी, सोलापूर यांचेकडे केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संजय गांधी निराधार योजनेच्या कामांमध्ये प्रगती नसल्यामुळे अनेक निराधारांची प्रकरणे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच योजनेतील त्रुटी दूर करुन निराधारांना लाभ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१९-१०-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) नाही.
(३) मंगळवेढा, जि.सोलापूर येथे संजय गांधी निराधार अनुदान समितीच्या बैठका आचारसंहिता व तांत्रिक अडचणीचा कालावधी वगळता वेळोवेळी घेण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे सद्य:स्थितीत संजय गांधी निराधार अनुदान योजना समितीसमोर एकही प्रकरण प्रलंबित नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर जिल्ह्यातील सोलापूर जिल्हा बँकेतर्फे शेतकऱ्यांना नवीन कर्ज देण्याबाबत**

**(२८) ११०९९४ (२१-०४-२०१८). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हा बँकेत शेतकऱ्यांना नवीन कर्ज घेणेसाठी त्यांच्याकडे असलेल्या एकूण क्षेत्रापैकी पिक व ७/१२ उताऱ्यावरील नोंदी पाहूनच कर्ज दिले जाणार असल्याचे दिनांक २५ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करणेसाठी शासन स्तरावरून बँकेच्या सर्वच अधिकाऱ्यांना सक्त निर्देश दिल्यामुळे शेतकऱ्यांना नव्याने कर्ज घेता येत नसल्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होणार असल्याचेही निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकऱ्यांना नव्याने कर्जपुरवठा करण्याबाबत जिल्हा बँकांनी कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२२-१०-२०१८) :** (१) नाही.

सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून शेतकऱ्यांना कर्ज घेण्यासाठी बँकेच्या कर्ज विषयक धोरणानुसार प्राथमिक सहकारी संस्थेच्या सभासदांचे प्रत्यक्ष पीकाखालील क्षेत्राची पाहणी व मोजणी करून कर्ज वितरण केले जात आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**दावडी (ता.खेड,जि.पुणे) येथे स्पार्किंग होऊन पॉलीहाउसने पेट घेतल्याने शेतकऱ्याचे झालेले नुकसान**

**(२९) १११००९ (०४-०४-२०१८). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दावडी (ता.खेड, जि.पुणे) येथे रोजी वीजेच्या तारांमध्ये स्पार्किंग होऊन आग लागून पॉलीहाउसने पेट घेतल्याने शेतकऱ्याचे मोठे नुकसान झाले असल्याचे दिनांक २४ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शेतकऱ्याने यापूर्वी वीजवाहक तारा धोकादायक असल्याची लेखी तक्रार सहायक अभियंता, राजगुरुनगर येथे वारंवार करुनही तारा बदलल्या गेल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, धोकादायक तारा बदलण्याची विनंती करुनही कार्यवाही न करणा-या व नुकसानीला जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत व संबधित शेतकऱ्याला नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-१०-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) संबंधित शेतकऱ्यांचा नुकसान भरपाई मिळणेबाबत लेखी अर्ज महावितरणच्या कार्यालयास प्राप्त झाला असून इतर आवश्यक कागदपत्रांची मागणी करण्यात आली असून नुकसान भरपाई देणेसंबंधीची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**लातूर जिल्ह्यातील लातूर ग्रामिण व औसा उपविभागाची पुनर्रचना करणेबाबत**

**(३०) १११३० (०४-०४-२०१८). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महावितरण विभाग निलंगा (जि.लातूर) अंतर्गत असलेल्या औसा उपविभागाची पुनर्रचना करण्याबाबत व लातूर विभागाचे दोन विभाग करून लातूर शहर व लातूर ग्रामीण असे दोन विभाग कार्यान्वित करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींच्या मागणीवरून सदर प्रस्ताव तात्काळ सादर करण्याचे व या प्रस्तावास मंजुरी देण्याबाबत कार्यवाही करण्याचे आदेश मा.ऊर्जा मंत्री महोदयांनी लातूर येथे दिनांक २९ जून २०१७ रोजी वा त्यासुमारास झालेल्या आढावा बैठकीत अधीक्षक अभियंता, महावितरण लातूर यांना दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रस्ताव सादर करण्याबाबत व तातडीने मंजुरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व सदर पुनर्रचना करण्याबाबत शासनास किती कालावधी लागेल?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०४-१०-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीने विहित केलेल्या मानांकनातील तरतुदींनुसार विभाग निर्मितीसाठी किमान १ लाख २०हजार वीज ग्राहक संख्या असणे आवश्यक आहे. सदर निकषाची पूर्तता होत नसल्यामुळे सद्य:स्थितीत लातूर विभागीय कार्यालयाचे विभाजन करणे सयुक्तिक होणार नाही. तथापि महावितरण कंपनीकडून नवीन कार्यालय निर्मितीची मानके व कर्मचारी/ग्राहक मानके यासंदर्भातील पुनर्विलोकनाची कार्यवाही सुरु आहे. सदर कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर, या प्रस्तावासंदर्भातील आर्थिक दायित्व विचारात घेऊन उपरोक्त विभाजनाबाबत कंपनीकडून उचित निर्णय घेण्यात येईल.

---

**तुळजापूर (जि.उस्मानाबाद) येथील मागासवर्गीय व इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांकरीता वसतीगृहाच्या इमारतीचे बांधकाम मंजूर करण्याबाबत**

**(३१) ११३१७४ (१९-०४-२०१८). श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तुळजापूर (जि.उस्मानाबाद) तालुक्यातील मागासवर्गीय व इतर मागासवर्गीय १०० विद्यार्थ्यांसाठी वसतीगृहाच्या इमारतीचे बांधकाम करण्याचे प्रस्तावित असून, त्याकरीता प्रशासनाकडून जागा उपलब्ध करुन देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी मागासवर्गीय व इतर मागासवर्गीय विद्यार्थी उपलब्ध असून त्यांची वारंवार मागणी असताना त्यासाठी आवश्यक ती जागा उपलब्ध करुन देण्याबाबत अडचणी होत आहेत, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर इमारतीकरीता जागा उपलब्ध असून देखील वसतीगृह इमारत बांधकाम मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०५-१०-२०१८) :** (१) होय.

(२) नाही. जिल्हाधिकारी उस्मानाबाद यांचे दि. ३०/५/२०११ च्या आदेशान्वये डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे वसतीगृह तुळजापूर, ता. तुळजापूर जि. उस्मानाबाद या वसतीगृहाच्या इमारत बांधकामासाठी तुळजापूर येथील सर्व्हे नं. २१५ मधील क्षेत्र १.२० हे. आर. जमीन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या ताब्यात देण्यात आली आहे.

(३) शासन निर्णय दि. १२ मार्च, २०१८ अन्वये मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतीगृह तुळजापूर या वसतीगृहाच्या नवीन बांधकामाकरीता रू.९,२५,४६,५३८/- (अक्षरी रूपये नऊ कोटी पंचवीस लक्ष शेहचाळीस हजार पाचशे अडतीस फक्त) इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजूरी देण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अमळनेर (जि.जळगांव) येथे मागासवर्गीय मुलींचे वसतीगृह इमारत बांधकामाला प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत**

**(३२) ११३२३० (२१-०४-२०१८). श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमळनेर (जि.जळगांव) येथे मागासवर्गीय मुलींचे वसतीगृह बांधकामाचा अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात समावेश होणेबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.सामाजिक न्याय मंत्री यांच्याकडे दिनांक १० फेब्रुवारी, २०१६ रोजीच्या पत्रान्वये केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पत्रान्वये अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात नवीन वसतीगृहाच्या इमारत बांधकामाचा समावेश करावा, असे निर्देश माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान दिले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतीगृह अमळनेर (जि.जळगांव) येथे वसतिगृहाकरीता इमारत भाडे तत्वावर न घेता वसतिगृहाच्या नवीन बांधकामास शासन स्तरावर उचित उपाययोजना व कार्यवाही होण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.सामाजिक न्याय मंत्री यांच्याकडे दिनांक ११ मे, २०१७ रोजी पत्रान्वये केली होती, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी माहे फेब्रुवारी, २०१६ पासून प्रलंबित असलेल्या प्रस्तावावर शासनाने अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१०-१०-२०१८) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे
(४) मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह अमळनेर जि.जळगाव येथील शासकीय वसतिगृह इमारतीच्या बांधकामास दि.१३ मार्च, २०१८ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही

---

**शिरवळ (ता.खंडाळा, जि.सातारा) येथील मागासवर्गीय मुलींसाठीच्या वसतिगृहाचे काम अपुर्णावस्थेत असल्याबाबत**

**(३३) ११५५४० (१९-०४-२०१८). श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिरवळ (ता.खंडाळा, जि.सातारा) येथील नायगाव विकास आराखड्याअंतर्गत प्रस्तावित असलेले मागासवर्गीय मुलींसाठी १०० खाटांचे मोफत वसतिगृहाचे काम अनेक वर्ष अपुर्णावस्थेत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे खंडाळा तालुक्यातील मागासवर्गीय विद्यार्थिनींची गैरसोय होत असल्याने शिरवळ व नायगाव येथील ग्रामस्थांनी वारंवार पाठपुरावा करून देखील सदर वसतिगृह इमारत बांधणीसाठी प्रशासकीय मान्यता मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर वसतिगृहाचे काम तातडीने सुरु करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१०-१०-२०१८) :** (१) नाही.
(२) शासन निर्णय दि. १२ मार्च, २०१८ अन्वये या वसतिगृहाच्या कामास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली असून या कामासाठी आवश्यक निधी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग करण्यात आलेला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासींना 'वन मित्र मोहिम' अंतर्गत जमिनींचा ताबा देणेबाबत**

**(३४) ११८९३३ (३०-०७-२०१८). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील वर्षानुवर्षे जंगलात राहून उपजीविका करणा-या अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासींना अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वन हक्काची मान्यता) कायदयातील तरतूदींची काटेकोरपणे अंमलबजावणी करुन प्रलंबित वन हक्क दावे व अपीले यांचा निपटारा करण्यासाठी मा.मुख्यमंत्री यांनी राज्यात 'वन मित्र मोहिम' राबविण्याचा निर्णय दिनांक १३ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास घेतला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, माहे जून २०१८ अखेरपर्यंत, राज्य शासनाने वन हक्क मोहिमे अंतर्गत, राज्यातील किती अनुसूचित जमाती व वन निवासींना त्यांच्या हक्काच्या जमिनी व १० वर्षापासूनचे प्रलंबित दावे व अपिले निकाली काढून प्रत्यक्षात जमीनीचा ताबा देण्यात आला आहे,
(३) असल्यास, अद्यापपर्यंत किती जमीनीचा ताबा शासनाकडून आदिवासी व वन निवासींना मिळणे बाकी आहे
(४) असल्यास, सदर जिमिनीचा ताबा किती कालावधी पर्यंत शासनाकडून आदिवासींना मिळणे अपेक्षित आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१६-१०-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
अनुसूचित जमाती व इतर पारंपारीक वन निवासी (वन हक्काची मान्यता) अधिनियम २००६ नियम २००८ व सुधारणा नियम २०१२ मधील तरतूदींची काटेकोर अंमलबजावणी करून प्रलंबित वनहक्क दावे व अपिल यांचा निपटारा करण्यासाठी दि.११ मे २०१८ अन्वये विशेष "वनमित्र मोहिम" राबविण्यात येत आहे.
(२) अनुसूचित जमाती व इतर पारंपारीक वन निवासी (वन हक्काची मान्यता) अधिनियम २००६ नियम २००८ व सुधारणा नियम २०१२ अंतर्गत दि. ३० जून २०१८ अखेर पर्यंत ३६०३९० इतके वैयक्तीक वनहक्क दावे ग्रामसभेकडे प्राप्त झाले आहेत. त्यापैकी एकुण १५६३१७ इतके दावे व अपिल जिल्हास्तरीय समितीने अंतिमरित्या मान्य केले असून एकुण ३,४३,४४२.०६

एकर इतक्या वन जमिनीचे क्षेत्र मंजूर करण्यात आले आहे तसेच एकुण १२०१३ इतके सामुहीक वन हक्क दावे ग्रामसभांकडे प्राप्त झाले असून त्यापैकी एकुण ७५४२ इतक दावे व अपिल जिल्हास्तरीय समितीने मान्य केले आहेत व त्यांना एकुण २७,२३,७६९.७८ एकर इतक्या वन जमिनीचे क्षेत्र मंजूर करण्यात आले आहे.

(३) व (४) अनुसूचित जमाती व इतर पारंपारीक वन निवासी (वन हक्काची मान्यता) अधिनियम २००६ नियम २००८ व सुधारणा नियम २०१२ अन्वये ग्रामसभा / उपविभागस्तरीय समिती/ जिल्हास्तरीय समितीकडे प्राप्त होणाऱ्या दाव्यांची अधिनियमातील तरतूदीनुसार तपासणी करण्यात येत असून करून त्याअनुषंगाने पुढील कार्यवाही सुरू आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### नाशिक विभागात आदिवासी योजनेचा निधी अखर्चित राहिल्याबाबत

**(३५) ११९०४१ (२६-०७-२०१८). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक विभागात गेल्या दोन वर्षापासून आदिवासी विकास महामंडळाने संचालक मंडळाच्या सूचना आणि ठरावाची अंमलबजावणी न केल्यामुळे आदिवासी योजनांचा कोटयावधींचा निधी शासनाला परत गेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे, त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विष्णु सवरा (१०-१०-२०१८) :** (१) हे खरे नाही. शासन पत्र दि.०९.०३.२०१८ अन्वये दिलेल्या निर्देशानुसार खावटी कर्ज योजनेचे रू.७०.२४ कोटी व न्युक्लीस बजेट समवर्तक निधीतील रू. ४.७३ कोटी असे एकूण ७४.९७ कोटी इतकी रक्कम शासन खाती वर्ग करण्यात आली.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### पुणे जिल्हयात दिव्यांग व निराधार वयोवृध्दांना मिळणारे अनुदान उशिराने मिळत असल्याबाबत

**(३६) ११९१३२ (२६-०७-२०१८). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील दिव्यांग व निराधार वयोवृध्दांना महिन्याकाठी मिळणारे अनुदान दोन ते तीन महिने उशिरा मिळत असल्याबाबतची तक्रार लाभार्थीनी दिनांक १६ एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास केली असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरच्या अनुदानासाठी लाभार्थ्यांना वारंवार बँक व तहसिल कार्यालयात जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात चौकशी करुन सदर लाभार्थ्यांना निर्धारित दिवशी अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजकुमार बडोले (१९-१०-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अनुसूचित जमाती जात पडताळणीचे काम सुरळीत करण्याबाबत

**(३७) ११९४२८ (२६-०७-२०१८). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अनुसूचित जमाती जात पडताळणी समितीचे काम सुरळीत करण्याबाबत आदिवासी हक्क संरक्षण समिती, महाराष्ट्र राज्य यांनी मा.आदिवासी विकास मंत्र्यांना दिनांक १४ ऑगस्ट, २०१७ रोजी निवेदन देऊन मागणी केली आहे, हे खरे आहे काय?
(२) असल्यास, उक्त निवेदनावर शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१०-१०-२०१८) :** (१) होय
(२) व (३) राज्यामध्ये आदिवासी विकास विभागांतर्गत ८ अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्या गठीत करण्यात आलेल्या आहेत. सदर समित्यांचे कामकाज हे अर्धन्यायिक स्वरुपाचे असून समित्यांकडे प्राप्त होणारे प्रत्येक प्रकरण गुणवत्तेनुसार तपासण्यात येते. सदर समित्या सक्षम करण्याच्या दृष्टीने समितीमधील रिक्त पदे भरण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच समितीवरील अधिकाऱ्यांना आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेमार्फत वेळोवेळी आवश्यक प्रशिक्षण देण्यात येते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मानेगाव (राजुरी) (तर.सांगोले, जि.सोलापूर) येथील १३२ के.व्ही.**
**विद्युत उपकेंद्राच्या कामाबाबत**

**(३८) १२०४७० (२७-०७-२०१८). श्री.गणपतराव देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मानेगाव (राजुरी) (ता.सांगोले, जि.सोलापूर) येथील १३२ के.व्ही. विद्युत उपकेंद्राचे व बुध्देहाळ, धायटी, चिकमहुद, सोनंद येथील ३३/११ केव्हीए उपकेंद्राचे काम संथ गतीने सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सांगोले तालुक्यामधील विजेच्या समस्या लक्षात घेता सदरहू कामे त्वरित पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१९-१०-२०१८) :** (१) व (२) १३२ के.व्ही. मानेगाव उपकेंद्राचे काम पूर्ण होऊन दिनांक ३१.०३.२०१६ रोजी कार्यान्वित झाल आहे. तसेच बुध्देहाळ, धायटी चिकमहुद, सोनंद येथील ३३/११ के.व्ही. उपकेंद्रे पायाभूत आराखडा -२ योजने अंतर्गत पूर्ण होऊन ती कार्यान्वित करण्यात आलेली आहेत. सद्यस्थितीत सदर भागामध्ये वीजपुरवठयाबाबतची समस्या नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई उपनगरातील विज व्यवसाय व विक्री संबधी रिलायन्स, अदानी**
**या दोन्ही कंपन्यांमध्ये झालेल्या कराराबाबत**

**(३९) १२०७५२ (२८-०७-२०१८). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील विज व्यवसाय व विक्री संबधी रिलायन्स व अदानी या दोन्ही कंपन्यांमध्ये १८ हजार ८०० कोटी रूपयांचा करार झालेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या करारान्वये मुंबईतील निर्मिती, वितरण आणि पारेषण हे तिन्ही व्यवसाय अदानी कंपनीकडे देण्यात येतील, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाची अंतिम मंजूरी न मिळाल्याने हा करार सध्या प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या कराराला अंतिम मंजूरी न देण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१९-१०-२०१८)** : (१) महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने दि. २८.६.२०१८ च्या आदेशान्वये रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड व रिलायन्स इलेक्ट्रीक जनरेशन ॲण्ड सप्लाय प्रायव्हेट लिमिटेड या कंपनींचे मुंबई शहारातील वीज व्यवसायाचे अदानी ट्रान्समिशन कंपनीला हस्तांतरण करण्याबाबत त्यांची अनुज्ञेयता पाहून काही अटींवर मान्यता दिली आहे. या आदेशात रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडच्या अखत्यारितील मुंबई वीज व्यवसायची मालकीचे हस्तांतरण रिलायन्स इलेक्ट्रीक ॲण्ड जनरेशन सप्लाय प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीचे १०० टक्के समभाग अदानी ट्रान्समिशन लिमिटेड कंपनीने रु.१३,२५१ कोटी इतकी किंमत देऊन खरेदी करणार असल्याचे नमूद आहे.

(२) मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या दि. १९ जानेवारी, २०१७ व दि. २० नोव्हेंबर, २०१७ च्या आदेशान्वये स्कीम ऑफ अरेंजन्मेट (Scheme of Arrangement) अंतर्गत मुंबईतील रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांचे निर्मिती, वितरण व पारेषण हे व्यवसाय अदानी इलेक्ट्रीसिटी मुंबई लि. यांच्याकडे दि. १.४.२०१८ पासून निहित (Vesting) करण्यात आले.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शिरोळ तालुक्यामध्ये ( जि.कोल्हापूर ) पॉवरग्रीड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. कंपनीतर्फे उभारण्यात आलेल्या टॉवरबाबत

**(४०) १२१३१६ (२८-०७-२०१८). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरोळ तालुक्यामध्ये ( जि.कोल्हापूर ) पॉवरग्रीड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. या भारत शासनाच्या कंपनीतर्फे उभारण्यात आलेल्या टॉवरची संख्या किती आहे,

(२) असल्यास, या टॉवरसाठी ज्या शेतक-यांच्या जमिनी संपादित करण्यात आल्या त्या नुकसानग्रस्त शेतक-यांना शासनाने किती नुकसान भरपाई दिली वा देण्यात येत आहे,

(३) असल्यास, या नुकसान भरपाईबाबत पुन्हा सर्वेक्षण होणेबाबत संबधित शेतक-यांकडून मागणी होत आहे हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१९-१०-२०१८) :** (१) पॉवरग्रीड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. या कंपनी मार्फत शिरोळ तालुक्यामधे (जि.कोल्हापूर) ४४ टॉवर उभारण्यात आले आहेत.

(२) संबंधित जमिनधारकांना एकूण रु. २,७९,५२,०८९ इतका मोबदला पॉवरग्रीड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. कंपनीकडून देण्यात आला आहे.

(३) व (४) शिरोळ तालुक्यातील ३ शेतकऱ्यांनी जिल्हा ग्राहक न्यायालय येथे तक्रार दाखल केली असून सदर प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**औसा व अहमदपूर (जि.लातूर) तालुक्यातील रेशीम विभागाच्या अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभाराबाबत**

**(४१) १२१३५२ (२३-०७-२०१८). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औसा व अहमदपूर (जि.लातूर) तालुक्यातील रेशीम लागवड केलेल्या शेतकऱ्यांना त्यांच्या लागवडीचे देयक काढण्यासाठी रेशीम अधिकाऱ्यांकडून जाणीवपुर्वक विलंब केला जात असून, कामाची माहिती ऑनलाईन भरली जात नसल्याबाबत तसेच त्यांच्या कामाबाबत असलेल्या तक्रारीची चौकशी करण्याची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुषंगाने दिनांक २३ फेब्रुवारी, २०१८ रोजी तहसिल कार्यालयात घेण्यात आलेल्या तालुका आढावा बैठकीस सदर विभागाचे अधिकारी व कर्मचारी गैरहजर असल्याबाबत योग्य ती चौकशी व कार्यवाही करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी उप विभागीय अधिकारी औसा, रेणापूर व तहसीलदार, औसा यांच्याकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषी अधिकारी व कर्मचारी यांच्यावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२०-१०-२०१८) : (१)** माहिती ऑनलाईन भरली जात नसल्याबाबत तसेच अधिका-यांच्या कामाबाबत असलेल्या तक्रारीची चौकशी करण्याची मागणी केलेली आहे. हे खरे आहे.

(२) दिनांक २७/०२/२०१८ रोजी तहसिल कार्यालयात घेण्यात आलेल्या तालुका आढावा बैठकीस विभागाचे अधिकारी व कर्मचारी गैरहजर असल्याबाबतच्या सदर तक्रारीची चौकशी करण्याबाबत लोकप्रतिनिधीनी यांनी मागणी केली आहे. हे खरे आहे.

(३) व (४) दिनांक २३/०२/२०१८ रोजी औसा येथे मा. विधानसभा सदस्य यांनी घेतलेल्या बैठकीस उपस्थित राहण्याबाबत जिल्हा रेशीम कार्यालय, लातूर अधिकारी/कर्मचारी यांना तहसील कार्यालयाकडून पत्र दिलेले नव्हते. त्याऐवजी ऐनवेळी भ्रमणध्वनीवरुन सभेला उपस्थित राहण्याचे आदेशीत करण्यात आले होते. रेशीम विकास अधिकारी रजेवर असल्याने आढावा बैठकीस गैरहजर होते. याबाबत रेशीम विकास अधिकारी यांनी सदर सभेस उपस्थित राहू शकत नसल्याचे निवेदन सादर केले आहे.

त्याबाबतचा खुलासा उप विभागीय अधिकारी औसा / लातूर यांचे समक्ष हजर राहून सादर केला आहे. दरम्यान संचालक रेशीम यांनी दिनांक ३१/०५/२०१८च्या नियतकालिक बदल्याच्या आदेशाव्दारे संबंधित क्षेत्र सहायक यांची बदली जिल्हा रेशीम कार्यालय, जालना येथे केली आहे.

___

**महावितरणने राज्यातील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्याच्या आखलेल्या योजनेबाबत**

**(४२) १२१३९२ (२८-०७-२०१८). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महावितरणने सन २०१७ - १८ या आर्थिक वर्षात प्रत्येक केंद्राला कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्याचे उद्दीष्ट निश्चित केले असून त्याद्वारे एकूण ४४ हजार ९१४ कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्याचे योजना आखलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास राज्यातील ठाणे, कल्याण, बुलढाणा, चंद्रपूर ही चार प्रशिक्षण केंद्रे वगळता अन्य २१ केंद्रांना कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्याचे दिलेले उद्दीष्ट गाठता आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) असल्यास, महावितरणने निश्चित केलेले प्रशिक्षणाचे उद्दीष्ट विहीत कालावधीत साध्य करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यत येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०४-१०-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) राज्यातील महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या ठाणे, कल्याण, बुलढाणा, चंद्रपूर या ४ प्रशिक्षण केंद्रांनी उद्दिष्ट पूर्ती केलेली आहे व अन्य २१ केंद्रांनी प्रशिक्षणाचे विविध उपक्रम राबवून ६०% उद्दिष्टांची पूर्तता केली आहे.

(३) प्रशिक्षण समन्वयकास प्रशिक्षणाच्या कामकाजाव्यतिरिक्त इतरही जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. उदा. ग्राहकांचा वीज पुरवठा सुरळीत ठेवण्याकरीता हाती घ्यावयाची तातडीची कामे,इत्यादी. तसेच, प्रशिक्षणासाठी निवडलेल्या प्रशिक्षणार्थींना आयत्यावेळी उद्‌भवणाऱ्या कामाच्या निकडीमुळे प्रशिक्षणासाठी हजर होता आले नाही. या कारणांमुळे उर्वरित २१ प्रशिक्षण केंद्रांना उद्दिष्टाची पूर्तता करणे शक्य झालेले नाही.

(४) प्रादेशिक प्रशिक्षण केंद्राना त्यांच्या क्षेत्रातील लघु प्रशिक्षण केंद्राच्या उद्दिष्ट प्राप्तीसाठी सहाय्य करण्यास कळविण्यात आले आहे. लघु प्रशिक्षण केंद्रातील “प्रशिक्षण समन्वयक” हे पूर्ण वेळ प्रशिक्षणाकरीता उपलब्ध रहावेत यासंबंधी आवश्यक सूचना सर्व संबंधित अधिक्षक अभियंत्यांना महावितरण कंपनीमार्फत देण्यात आल्या आहेत. याबाबत सर्व लघु प्रशिक्षण केंद्रांच्या समन्वयकांची आढावा बैठक मुख्य महाव्यवस्थापक (प्र.व.सु.) महावितरण, एकलहरे, नाशिक यांच्यामार्फत वेळोवेळी घेण्यात येते व सदर आढावा बैठकीत संबंधितांना विहित मुदतीत उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी योग्य त्या सूचना देण्यात येतात.

---

**बिंझवार जमातीची तत्सम जमाती म्हणून इंझवार जमातीचा यादीत समावेश करण्याबाबत**

**(४३) १२२३६१ (२७-०७-२०१८). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मा. उच्च न्यायालय मुंबईच्या नागपूर खंडपीठाच्या दिनांक २४ फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास दिलेल्या आदेशानुसार बिंझवार आणि इंझवार या जमाती एकच असल्याने राज्याच्या अनुसूचित जमातीच्या यादीत बिंझवार जमातीची तत्सम जमाती म्हणून इंझवार जमातीचा समावेश करण्याबाबत प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविण्याबाबत उपसचिव महाराष्ट्र शासन आदिवासी विकास विभाग यांनी आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रक्षिशण संस्था पुणे यांच्याकडून शासन पत्र दिनांक ७ मे, २०१८ च्या पत्रान्वये अहवाल मागविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अहवाल मा. आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रक्षिशण संस्था पुणे यांच्याकडून शासनास प्राप्त झाला आहे काय,

(३) असल्यास, या अहवालात कोणत्या शिफारशी करण्यात आल्या आहेत,

(४) असल्यास, राज्याच्या अनुसूचित जमातीच्या यादीत बिंझवार जमातीची तत्सम जमाती म्हणून इंझवार जमातीचा समावेश करण्याबाबत प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१०-१०-२०१८) :** (१) आदिवासी बिंझवार (इंझवार) समाज समिती नागपूर यांच्या "महाराष्ट्र राज्यातील भंडारा गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली या जिल्हयात राहणाऱ्या आदिवासी झंझवार जमातीचा बिंझवार जमातीची तत्सम (Synonym) जमात म्हणून महाराष्ट्राच्या अनुसुचित जमातीच्या यादीत अनु. क्र.१० वर समावेश करण्याबद्दलचा अहवाल केंद्र शासनाकडे पाठविण्याबाबत" च्या दि.१८.०२.२०१८ च्या निवेदनाच्या अनुषंगाने दि.०७.०५.२०१८ च्या पत्रान्वये आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्याकडून स्वयंस्पष्ट अभिप्राय मागविण्यात आले होते.

(२) होय

(३) इझंवार या जातीमध्ये कोणत्याही प्राचीन पध्दतीचे जीवनमान आढळून येत नाही, त्यांची वस्तीस्थाने ही इतर जातीच्या लोकांमध्येच आहे. त्यामुळे भौगोलिक अलिप्तता हा निकष पुर्ण करीत नाही. तसेच भिन्न संस्कृतीचाही निकष पुर्ण करीत नाही. त्यामुळे या जातीचा अनुसूचित जमातीच्या यादीत समावेश करता येणार नाही, असा अहवाल प्राप्त झाला आहे.

(४) व (५) महाराष्ट्र राज्याच्या अनुसूचित जमातीच्या यादीत बिंझवार जमातीची तत्सम जमात म्हणून इंझवार जमातीत समावेश करण्याबाबतचे अभिप्राय यापुर्वी दि.२३.०२.२०१२ रोजीच्या पत्रान्वये केंद्र शासनास सादर करण्यात आले होते. मा.उच्च न्यायालयाने याचिका क्रमांक १८०/२०१६, ४६२५/२०१६ व ६४०९/२०१६ मध्ये दि.२४.०२.२०१८ रोजी दिलेल्या आदेशानुसार सदर कागदपत्र दि.१२.०७.२०१८ च्या पत्रान्वये केंद्र शासनास पुन्हा सादर करण्यात आली आहेत.

---

**कोल्हापूर जिल्हयातील शेतकऱ्यांना गळीतास आलेल्या**
**उसाच्या देयकाची थकीत रक्कम देण्याबाबत**

**(४४) १२३००९ (२८-०७-२०१८). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील दत्त दालमिया साखर कारखान्याने सन २०१७-१८ मध्ये गळीतास आलेल्या उसाच्या देयकापोटी प्रतिटन ४०० रुपयांची थकबाकी अद्याप कायम ठेवली असल्याची बाब माहे जून, २०१८ मध्ये त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१७-२०१८ च्या समझोत्याप्रमाणे गळीतास आलेल्या उसास एफ.आर.पी अधिक २०० रुपये असे दर प्रति टन ठरलेले असताना दिनांक १७ डिसेंबर २०१७ पर्यंत २५०० रुपये प्रति टन ऊस देयक दिले असून अद्याप चारशे रुपये प्रतिटन थकबाकी आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन शेतकऱ्यांना थकीत रक्कम देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०३-१०-२०१८) :** (१) नाही.

(२) व (३) दालमिया भारत शुगर्स ॲण्ड इंडस्ट्रीज. लि, (दत्त, आसुर्ले- पोर्ले ) ता. पन्हाळा, जि.कोल्हापूर या कारखान्याने हंगाम सन २०१७-१८ मध्ये गाळप केलेल्या ऊसापोटी ऊस पुरवढादारांना देय FRP प्रतिटन रु. २७९२.४९ प्रमाणे ऊस किंमत अदा केली आहे. सदर कारखान्याकडे FRP थकबाकी निरंक आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वाशिम जिल्हयातील लाभार्थी शेतकऱ्यांकडून थकबाकीची मागणी केल्याबाबत**

**(४५) १२३४५१ (२८-०७-२०१८). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्हयातील शेतकऱ्यांना पीक कर्ज वाटप करताना बँकाकडून थकबाकीची मागणी केली जात असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी वाशिम जिल्हा प्रशासनाने कर्ज वाटप करणाऱ्या सर्व बँकांना कुठल्याही शेतकऱ्यांकडे थकबाकीची मागणी करु नये तसेच पीक कर्जास पात्र असलेल्या सर्व शेतकऱ्यांना विनाविलंब कर्ज वाटप करावे, असे आदेश देण्यात आले आहे काय

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२२-१०-२०१८) :** (१) नाही.

जिल्हाधिकारी वाशिम यांचे कार्यालयीन आदेश दिनांक १९/०४/२०१८ अन्वये, सहकारी कर्जाचे पुनर्गठण व शेतीशी निगडीत कर्जाच्या वसुलीस स्थगिती असा आदेश पारित करण्यात आला. तसेच सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, दिनांक ३१/०५/२०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार थकीत कर्जाच्या वसुलीला स्थगिती देण्यात आली होती.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रूझां (ता.केळापूर जि.यवतमाळ) परिसरातील शेतक-यांना त्यांच्या शेतातून टाकण्यात आलेल्या पावर लाईनचा अल्प मोबादला मिळाला असल्याबाबत**

**(४६) १२४२०० (२८-०७-२०१८). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रूझां (ता.केळापूर, जि.यवतमाळ) परिसरातील कारेगांव, मोहदरी,कृष्णापूर, रूझां येथील शेतक-यांच्या शेतामधून पॉवर ग्रिड कॉर्पोरेशन ऑफ इंडियाची वरोरा ते परळी ७६५ के.व्ही.ची लाईन टाकण्यात आली असून सदर भागातील शेतक-यांच्या जमिनीचे विभागामार्फत मोजमाप करण्यात आले परंतु शेतक-यांना नुकसानीचा अल्प मोबदला देण्यात आला असल्याचे त्यांनी दिलेल्या निवेदनावरून दिनांक १५ मे २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत उपविभागीय अधिकारी, केळापूर यांच्याकडे बैठक झाली असून सबंधित शेतक-यांच्या संपादित केलेल्या शेतजमिनी व पिक नुकसानीचा मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१९-१०-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) शासनाच्या प्रचलित निर्णयानुसार वाहिनीग्रस्त जमिनीचा मोबदला देण्यासाठी उप विभागीय अधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीने दिनांक ०७.०७.२०१८ रोजी मोबदला देण्यासंदर्भात अंतिम निर्णय घेतला आहे. त्यानुसार पॉवर ग्रीड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया कंपनीकडून संबंधित जमीन धारकांना मोबदल्याची रक्कम देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महापारेषणने १७२६ पदांची केलेली कपात**

**(४७) १२४३५० (२८-०७-२०१८). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महापारेषणने १७२६ पदांची कपात केल्यामुळे महापारेषणचे अभियंते व यांत्रिकी कर्मचाऱ्यांमध्ये असंतोष असून महापारेषण कंपनीने नव्या कर्मचारी संचरचनेचे दोन प्रस्ताव तयार केले असुन पहिल्या प्रस्तावात २१३० तर दुसऱ्या प्रस्तावात १७२६ पदांची कपात सुचविली होती, त्यानुसार दिनांक १७ नोव्हेंबर २०१७ रोजी दुसरा प्रस्ताव स्विकारत नव्या आकृतीबंधाला मंजुरी दिलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महापारेषणच्या नव्या आकृतीबंधाच्या दुसऱ्या प्रस्तावास दिलेल्या मंजुरीमुळे अतिरिक्त कार्यकारी अभियंत्याची २५, उप कार्यकारी अभियंत्याची ४०६, वरीष्ठ यंत्रचालकांची ९२३ व यंत्रचालकांची ३७२ अशी एकुण १७२६ पदांची कपात केली जाणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नव्या आकृतीबंधाच्या दुसऱ्या प्रस्तावात मोठया प्रमाणात मनुष्यबळ कमी केल्यामुळे महापारेषणमध्ये कार्यरत कर्मचाऱ्यांवर कामाचा अतिरिक्त ताण पडत असल्यामुळे शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-१०-२०१८) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

महापारेषण कंपनीची विविध कार्यालये, उपकेंद्रे यामधील कामाचे स्वरुप व त्या ठिकाणी लागणारा कर्मचारीवर्ग या सर्व बाबींचा विचार करुन सुधारित आकृतीबंध महापारेषण कंपनीकडून तयार करण्यात आला आहे. सदर सुधारित प्रशासकीय रचनेमुळे कार्यरत कर्मचाऱ्यांच्या संख्येत कपात करण्यात आलेली नाही अथवा कोणत्याही कर्मचाऱ्याला पदावनत केले जाणार नाही.

(३), (४) व (५) महापारेषण कंपनीने तांत्रिक संवर्गात कार्यरत मनुष्यबळात कपात केली नसून, पदांची पुनर्रचना केली आहे. सदरील सुधारित प्रशासकीय रचनेमुळे कर्मचाऱ्यांना प्रत्येक टप्प्यावर पदोन्नतीचा मार्ग उपलब्ध झाला आहे. सबब चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**शाहुवाडी (जि.कोल्हापूर) तालुक्यात अवैधपणे देशी दारू विक्री होत असल्याबाबत**

**(४८) १२४३५६ (२७-०७-२०१८). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शाहुवाडी( जि.कोल्हापूर) तालुक्यात अनेक ठिकाणी अवैध देशी दारू विक्री चे प्रमाण वाढले असल्याचे निदर्शनास येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अवैध देशी दारू विक्री ही स्थानिक हॉटेल्स, पानपट्टी, किराणा मालाचे दुकान, टेलरिंग दुकान आदी ठिकाणाहून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अवैध देशी दारू विक्री मुळे लोकांच्या आरोग्यावर परिणाम होत असून कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने शाहुवाडी तालुक्यात बेकायदा दारू विक्री व्यवसायाला प्रतिबंध घालण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१६-०८-२०१८) :** (१), (२) व (३) अंशत: खरे आहे. मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार राष्ट्रीय व राज्य महामार्गावरील मद्यविक्री अनुज्ञप्त्या बाधीत झाल्यामुळे काही हॉटेल व ढाबे या ठिकाणी अवैध मद्य विक्रीची प्रकरणे आढळून आली आहेत. सदर अवैध मद्यामुळे आरोग्यावर विपरीत परिणाम होत असतो. परंतु त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.
(४) राज्य उत्पादन शुल्क विभागाने शाहुवाडी तालुक्यात सन २०१७-१८ मध्ये एकूण ५४ गुन्हे नोंदविले असून त्यामध्ये रु.५.०२ लक्ष किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. माहे एप्रिल व मे, २०१८ या कालावधीमध्ये एकुण ५ गुन्हे नोंदविण्यात आले असून रु.३०,६२०/- इतक्या किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईत ९ सराईत गुन्हेगारांकडून महाराष्ट्र दारुबंदी कायदा, १९४९ मधील कलम ९३ नुसार चांगल्या वर्तणूकीचे बंधपत्र घेण्याबाबत प्रस्ताव सादर करण्यात आले आहेत. तसेच, पोलीस विभागाकडूनही सन २०१८ मध्ये एकूण १६ गुन्हे नोंदविण्यात आले असून यामध्ये १६ आरोपींना अटक करण्यात येवून रु.२४,४८३ किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

राज्य उत्पादन शुल्क विभागामार्फत पोलीस विभागाशी समन्वय साधून संयुक्त मोहीमेद्वारे अवैध दारू धंद्याविरोधात कारवाई केली जाते. तसेच अवैध मद्य विक्रीबाबत माहिती मिळविण्याकरीता पोलीस पाटील, तंटामुक्ती सदस्य, शासकीय यंत्रणांशी समन्वय साधण्यात येत असून ग्रामरक्षक दल स्थापन करण्याबाबत तालुक्यातील ग्रामपंचायतींना कळविण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुर्व विदर्भातील 'माना' जमातीला जात वैधता प्रमाणपत्र देण्याबाबत**

**(४९) १२५२७७ (२७-०७-२०१८). श्री.राजेश काशीवार (साकोली), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी), श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पुर्व विदर्भात माना जमातीच्या लोकांचे मोठ्या प्रमाणात वास्तव्य असून सन १९५६ च्या अनुसुचित जमातीच्या यादीत अ.क्र.१२ वर व सन १९७६ च्या यादीत अ.क्र.१८ वर 'माना' जमातीचा समावेश आहे तसेच या जातीच्या विद्यार्थी व नागरिकांना उपविभागीय अधिकारी कार्यालयातंर्गत 'माना' जमातीचे जातीचे प्रमाणपत्र सुद्धा देण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी जात पडताळणी समितीपुढे जातीचे प्रमाणपत्र सादर करूनही सन २०१२ पासून 'माना' जमातीच्या विद्यार्थी व नागरिकांना जात वैधता प्रमाणपत्र देण्यात येत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, जात वैधता प्रमाणपत्राअभावी 'माना' जमातीचे विद्यार्थी शिक्षण व इतर सुविधांपासून वंचित राहत असून 'माना' जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र प्रकरणे तात्काळ निकाली काढून 'माना' जमातीला जात वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विष्णु सवरा (१०-१०-२०१८) :** (१), (२) व (३) केंद्र शासनाने महाराष्ट्र राज्यासाठी प्रसिध्द केलेल्या अनुसूचित जमातीच्या यादीत अ.क्र. १८ वर "..Mana,.." अशी नोंद आढळते. शासनाने महाराष्ट्र अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र ( देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन), सदर नियम २००३ मधील ३ (३) नुसार कागदपत्रे सादर करणाऱ्या उमेदवारांना अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र मिळते. तसेच नियम ११ (२) मध्ये जात पडताळणी समितीला प्रमाणपत्र तपासणीसाठी सादर करावयाची कागदपत्रे नमुद केलेली आहेत. त्यानुसार नमुद केलेली कागदपत्रे व पुरावे सादर करणाऱ्या व्यक्तीस अनुसूचित जमातीचे वैधता प्रमाणपत्र मिळते. उक्त अधिनियम, २००० मधील कलम ८ नुसार अनुसूचित जमातीचे फायदे घेणाऱ्या अर्जदाराने तो ज्या जमातीचे किंवा वर्गाचे आहेत, हे सिध्द करण्याची जबाबदारी असा दावा करणाऱ्या अर्जदार व्यक्तीवर असेल, अशी तरतुद आहे.

अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांच्या कामकाजाचा आढावा शासनाकडून वेळोवेळी घेण्यात येतो. तसेच प्रलंबित प्रकरणे जलद गतीने निपटारा करण्याबाबत वेळोवेळी सुचनाही देण्यात येतात.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विदर्भातील बेरार प्रांतातील महादेव कोळी जमातीला**
**जमातीचे जात प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

**(५०) १२५६०३ (२६-०७-२०१८). श्री.रवि राणा (बडनेरा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याच्या विदर्भ विभागातील बेरार प्रांतातील सातपुडा पर्वताच्या महादेव डोंगराच्या पायथ्याशी राहणाऱ्या महादेव कोळी जमातीच्या परंतु नोकरी व्यवसाया निमित्त राज्यातीत इतरत्र स्थालांतरित झालेल्या अश्या जमातीच्या नागरिकांना महादेव कोळी जमातीचे प्रमाणपत्र मिळण्याकरिता लोकप्रतिनिधींनी शासनाकडे मागणी केली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त जमातीला महादेव कोळी जमातीचे प्रमाणपत्र मिळणे आवश्यक असून ते न मिळाल्याने त्यांना नोकरी, व्यवसायासाठी अडचणी निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रमाणपत्र देण्याबाबत सचिव, आदिवासी विभाग यांचेकडे दिनांक ५ जून २०१७ रोजी पत्र प्राप्त झाले असून याबाबत जमातीचे जात प्रमाणपत्र देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१०-१०-२०१८) :** (१) होय.
(२) व (३) शासनाने महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग जातीचे प्रमाणपत्र ( देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम २००० लागू केला असून त्याअंतर्गत महाराष्ट्र अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २००३ तयार केलेले आहेत. सदर नियम २००३ मधील नियम ३ (३) नुसार कागदपत्रे सादर करणाऱ्या उमेदवारांना अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र मिळते. तसेच नियम ११ (२) मध्ये जात पडताळणी समितीला प्रमाणपत्र तपासणीसाठी सादर करावयाची कागदपत्रे नमुद केलेली आहेत. त्यानुसार नमुद केलेली कागदपत्रे व पुरावे सादर करणाऱ्या व्यक्तीस अनुसूचित जमातीचे वैधता प्रमाणपत्र मिळते. उक्त अधिनियम २००० मधील कलम ८ नुसार अनुसूचित जमातीचे फायदे घेणाऱ्या अर्जदाराने तो ज्या जमातीचे किंवा वर्गाचे आहेत, हे सिध्द करण्याची जबाबदारी असा दावा करणाऱ्या अर्जदार व्यक्तीवर असेल, अशी तरतुद आहे.

अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांच्या कामकाजाचा आढावा शासनाकडून वेळोवेळी घेण्यात येतो. तसेच प्रलंबित प्रकरणे जलद गतीने निपटारा करण्याबाबत वेळोवेळी सुचनाही देण्यात येतात.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.